

Champha Charitable Trust E.954 Amravati

# Pundlik Prashaskiy Mahavidyalaya, Amravati

&

## Indirabai Meghe Mahila Mahavidyalaya, Amravati

**JOINTLY ORGANISED**

**One Day National Conference**

**On**

**"Role Of Civil Services And Hospitality Education in Employability"**

# Certificate

This is to certify

Mr./Mrs./Prof./ Dr प्रिती किशोर उमाठे

from डॉ. एम. के. उमाठे महाविद्यालय. नागपूर

has Participated in the One Day National Conference on

"Role Of Civil Service And Hospitality Education in Employability" held

on 25th January 2020 at. Vidharbha Vibhagiya Sahakar Board Amravati.

He/She Chaired a session on

Presented Paper entitled ग्रामीण विकास कार्यक्रम

Prof. Jitendra Deshmukh
Principal
P.P.M. Amt.

Dr. Leena Kandalkar
Principal
I.M.M.M. Amt.

Dr. Seema B. Adhau
Chairman,
Champha Charitable Trust, Amt.

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

Impact Factor – 7.765 ISSN-2278-9308

# B.Aadhar

*Multidisciplinary International Research Journal*

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

January -2020

SPECIAL ISSUE - CCIV

## Role of Civil Service and Hospitality Education in Employability

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Anil B. Bhagat
Ramkrushna Mahavidyalaya Darapur
Dist. Amravati.

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

Global Impact Factor (GIF)

Universal Impact Factor (UIF)

International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor - 7.765 ISSN - 2278-9308

# B.Aadhar

***Multidisciplinary International Research Journal***

Peer-Reviewed Indexed

**January - 2020**

**SPECIAL ISSUE - CCIV**

## *Role of Civil Service and Hospitality Education in Employability*

Chief Editor :
Dr. Virag.S.Gawande

Editor :
Dr.Anil B. Bhagat
**Ramkrushna Mahavidyalaya Darapur**
**Dist. Amravati.**

**Aadhar International Publications**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© **All rights reserved with the authors & publisher** **Price : Rs. 225/-**

# Editorial Board

**Chief Editor -**

**Prof.Virag S.Gawande,**

**Director,**

Aadhar Social Research &,

Development Training Institute, Amravati. [M.S.] **INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage. **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr. Jiro Akita** - Professor Of Economics Tohoku University. Japan
- **Dr.Usha Sinha** . Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Asstt. Professor Dr. P. D. College of Law, Amravati


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

- **Executive Editor**

**Published by -**

- **Prof.Virag Gawande Aadhar Publication Amravati 444604**

Email : aadharpublication@gmail.comWebsite : www.aadharsocial.comMobile : 9595560278

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | सदानंद देशमुख यांच्या साहित्यातून व्यक्त झालेले ग्रामीण भागातील भिषण वास्तव व कुचकामी ठरलेल्या शासकीय यंत्रण — प्रा. डॉ. अनिल बाभुळकर | 1 |
| 2 | राष्ट्रसंताची ग्रामगीता ग्रामविकासाची पायवाट — प्रा. डॉ. वंदना भोयर | 6 |
| 3 | ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आहाराविषयक जागरुकता — प्रा. ज्योती देशमुख | 10 |
| 4 | आदरातिथ्यातुन बालगुन्हेगारीला पायबंद — प्रा. योगीता टिकस | 12 |
| 5 | लोकप्रशासनाच्या सहभागाचे मुल्यांकनात्मक अध्ययण — प्रा. श्याम निळकंठ साबळे | 15 |
| 6 | परफॉर्मन्स इव्हॅल्युएशन ऑफ सिवील सर्विस — कु. शीतल साखरे | 18 |
| 7 | हॉस्पिटॅलीटी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयच्या लायब्ररी सेवेची गुणवत्ता व महत्व — सुधीर बा. सांगोले | 20 |
| 8 | समाजाच्या सामान्य अभ्यासामध्ये समाजषास्त्राची भूमिका — संदीप हाडोळे | 24 |
| 9 | ग्रामीण साहित्यातून व्यक्त होणारे ग्रामीण समाज व्यवस्थेचे चित्रण — रुपेश बाळकृष्णराव फुके | 28 |
| 10 | नोकरी करणा–या महिला आणि मुलांचा शारीरिक विकास — डॉ.रोहिणी दि.मेश्राम | 32 |
| 11 | रोजगार उद्योगात नवीन ट्रेन्ड म्हणून मॅनेजमेंटची आव्हाने — रश्मी खेडकर | 36 |
| 12 | कन्या भ्रूण-हत्या क्या एक सामाजिक समस्या — मीना अहिरवाल | 38 |
| 13 | देशाच्या विकासात लोकसेवा आयोगाची भूमिका — प्रा.कल्पना एस.गोडघाटे | 43 |
| 14 | आतिथ्य उद्योगाची आव्हाने — प्रो. प्रिया खोरगडे | 48 |
| 15 | ग्राहकांमधील जागरुकता एक अध्ययन — प्रा मृणालिनी बा. गावंडे, प्रा. डॉ. शामली जा. दिघडे | 51 |
| 16 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा ग्रामरक्षण विषयक मूल्यात्मक दृष्टीकोन — डॉ. मंदा नांदुरकर | 56 |
| 17 | नागरी संस्कृती आणि मराठी साहित्य — डॉ. एम.ए. मेश्राम | 59 |
| 18 | लीळाचरित्रकालीन ग्रामव्यवस्था — प्रा.डॉ. ममता इंगोले | 61 |
| 19 | पेशवेकालीन घोडदळ व्यवस्था — डॉ. विष्णू रायभान पडवाल | 67 |
| 20 | ग्रामिण भागातील संयुक्त कुटुंबाचे बदलते स्वरुप' — प्रा. डॉ. सुवर्णा विष्णू तायडे - अंभोरे | 70 |
| 21 | मराठी कादंबरीचे ग्रामविकासात योगदान — प्रा.डॉ.शोभा रोकडे | 72 |
| 22 | ग्रामीण विकास कार्यक्रम — डॉ. प्रिती किशोर उमाठे | 74 |

# ग्रामीण विकास कार्यक्रम

प्रा. प्रिती किशोर उमाठे
मराठी विभाग प्रमुख डॉ. एम. के उमाठे कॉलेज नागपूर २२

संपूर्ण जगामध्ये व्यक्ती, कुटुंबे, समुदाय आणि राष्ट्रांनी मनात बाळगलेले वैश्विक पातळीवरील ध्येय हे विकासाचे आहे. पृथ्वीवरील सर्व स्वरूपातील सजीवांमध्ये जगण्याची व विकासाची ओढ असते. त्यामुळे या स्वरूपात विकास हा निसर्गिकही आहे. 'विकास' ही एक वस्तुनिष्ठ आणि मुल्य आधारित संकल्पना आहे. त्यामुळे तिच्या अर्थाबाबत एकमत असू शकत नाही मात्र कोणत्याही संस्कृती, धैर्य, आणि अवकाशीय स्थानातील सर्व व्यक्ती, समुदाय आणि राष्ट्रांची विकासाची आकांक्षा असते. ग्रामीन लोकांच्या जीवनामध्ये समग्र सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून 'ग्रामीण विकास' अत्यंत महत्वाचा आहे. ग्रामीण विकास ही एक सर्वसमावेशक आणि विविधांगी संकल्पना आहे. यामध्ये कृषी संबंधीत उपकम, ग्रामीण व कुटीर उद्योग, ग्रामीण कला व हातकला, सामाजिक आर्थिक पायाभूत सुविधा, समुदाय सेवा व सुविधा आणि या सर्वाहून महत्वाचे म्हणजे ग्रामीण भागातील नैसर्गिक आणि मानवी साधनसंपत्ती यांचा विकास यामध्ये समावेश आहे.

अत्यंत प्राचीन काळापासून भारत हा ग्रामीण समुदाय आहे. ग्रामीण समुदाय म्हणजे खेड्यत राहनाऱ्या आणि शेती व शेती सलंग्न व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या लोकांचा समूदास आहे. ग्रामीण समुदाय हा मोठ्य प्रमाणावर सजातीय स्वरूपाचा असतो. शेती हा ग्रामीण लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. भारत हा अद्यपही खेड्यचा देश म्हणून ओळखला जातो. सुमारे ६०: टक्के भारतीय लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण जीवनाच्या सर्वच अंगावर उदा ; सामाजिक आंतरकिया, सामाजिक सबंध, रूढी, परंपरा, श्रध्दा, मुल्ये , कला, उत्सव, खानपान व पोशाखाच्या सवयी, व्यक्तीचे व्यक्तीमत्व इत्यादीवर शेती व्यवसायाचा प्रभाव पडलेला दिसतो. ग्रामीण समुदायात श्रमविभाजन आणी विशेषीकरण यांना फारसा वाव नसतो. ग्रामीण समुदायावर निसर्गाचा मोठा प्रभाव आहे. शेती व शेती व्यवसायामुळ ग्रामीण लोकांचा हवा, पाणी, सुर्यप्रकाश, वारा, माती, पशुपक्षी, वनस्पती इत्यादी नैसर्गिक घटकांचा घनिष्ठ संबंध येतो. शहरी समुदायापेक्षा ग्रामीण समुदायाचा आकार लहान असतो. स्त्रियांचा दर्जा ग्रामीण समुदायात निम्न (कनिष्ठ) स्वरूपाचा आहे. ग्रामीण समुदायांचे जीवन हे अत्यंत साधे व लोकांचे वर्तन स्वाभाविक व उस्फूर्त आहे. ग्रामीण जीवणपध्दती मध्ये भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व राजकिय गतिशिलता दिसून येते. बहूसंख्य ग्रामीण भागात दारिद्र्य, बेरोजगारी, मागसलेली शेती, कर्जबाजारीपणा व आर्थिक विषमता प्रामूख्याने दिसून येते. इतकेच नव्हे तर जातीवाद, लिंगभेद, अनिष्ठ प्रथा, अनारोग्याची समस्या, निरक्षरता व उच्च शिक्षणाचा अभाव ग्रामीण भागावर प्रचंड आघात करित आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागाचे चित्र विकासाच्या दृष्टीने अधिकच खालावलेले आहे. थोडक्यत ग्रामीण समाज जीवनाच्या समग्र विकासांचा कार्यक्रमाचा आढावा घेण्याचा विचार प्रामुख्याने केला आहे. कारण ग्रामीण विकास भारतासाठी आत तातडीची आणि निव्वळ गरज आहे. आणी भविष्यात हा राहिल. भारताच्या विकासाचा हा अपरिहार्य घटक आहे.

(अ) समुदाय विकास कार्यक्रम

'ग्रामीण' लोकांमध्ये प्रगतिशील दृष्टिकोन निर्माण करून व त्यांचा ग्रामीण विकासातील सहभाग वाढवून ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी २ ऑक्टोबर १९५२ रोजी समुदाय विकास कार्यक्रम सुरू केला. या कार्यक्रमांतर्गत जलसिंचन, शिक्षण, आरोग्य, वैद्यक व स्वच्छता, गृहनिर्माण,पिण्याचे पाणी, वाहतूक व संप्रेषण, समुदाय केंद्रे, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम यांसारख्या सुविधा भारतातील जवळपास सर्वच खेड्यांना पुरविण्यात आल्या होत्या. समुदाय विकास कार्यक्रमास सुरूवातीच्या काळात काही प्रमाणात यश मिळाले. परंतु लोकांचा विकास कार्यक्रमात परिणामकारक सहभाग मिळविण्यामध्ये हा कार्यक्रम अयशस्वी ठरला. त्यामुळे समुदाय विकास कार्यक्रमाच्या कार्यपदधतीचे मूल्यमापन करून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी सरकारने बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी १९५७ मध्ये एक समिती नेमली. या समितीने पंचायत राज्यव्यवस्था या नावाची लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्त्वावर आधारलेली त्रिस्तरीय योजना राबविण्याची शिफारस केली. या शिफारशीनुसार १)ग्रामस्तरावर ग्रामपंचायत २) गट स्तरावर पंचायत समिती ३) जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद या तीन प्रतिनिधिक संस्था स्थापन केल्या आहेत. या तीन संस्थांना पुरेशी साधने व ग्रामीण समुदायासंदर्भातील सत्ता देण्यात आली असून ग्रामीण विकासाचे सर्व कार्यक्रम (उदा. शैक्षणिक व आरोग्य सुविधा, रस्ते, वीज, पाणीपुरवठा जलसिंचन, संप्रेषण, मनोरंजन इ.) आता या तीन संस्थांच्याद्वारे राबविले जात आहेत. ७३ व्या राज्यघटना दुरूस्तीने या पंचायत राज्यव्यवस्थेस घटनात्मक दर्जा दिलेला आहे.

**(ब) कृषी विकास कार्यक्रम**

शेती हा ग्रामीण लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. परंतु जमीनदारी पदधती, लोकसंख्या वाढीचा जमिनीवर (शेतीवर) वाढत जाणारा ताण, कालबाह्य शेती उत्पादनतंत्राचा वापर, अपुरा व अनियमित पाऊस, वित पुरवठा व विपणनाच्या अपुऱ्या सुविधा, जमीनधारणेचे लहान क्षेत्र इत्यादी कारणांमुळे शेती व्यवसाय हा मागासलेल्या अवस्थेत आहे आणि शेतीचा मागासलेपणा हे दारिद्र्य,बेकारी व इतर समस्यांचे मुख्य कारण आहे.

१.जमीण सुधारणा

स्वातंत्र्य – पूर्वकाळात जमिनिची मालकी व नियंत्रण हे मूठभर जमीनदाराच्या हातात होते. हे जमीनदार प्रत्यक्ष शेती कसणाऱ्या आपल्या कुळांकडून जास्तीत जास्त खंड उकळून त्यांचे शोषन करीत. त्यामुळे उत्पादन वाढविण्यासाठी शेतीचा विकास करण्याची प्रेरणा कुळांना जमीनदारी पदधतीत मिळत नव्हती. म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकाने जमीन सुधारणा कार्यक्रम सुरू केला.

२. तांत्रिक सुधारणा

शेतीत वापरल्या जाणाऱ्या कालबाह्य तंत्रामुळे शेतीची उत्पादकता व उत्पादन खूपच कमी होते. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने शेतीची उत्पादकता व उत्पादन वाढविण्यासाठी पुढील तांत्रिक सुविधा पुरविलेल्या आहेत. संकरीत बी – बीयाणे, रासायनिक खते, जंतुनाशके, आधुनिक शेती अवजारे इत्यादींचा वापर करून उत्पादन वाढीच्या विविध योजना राबविल्या आहेत.

शेतीला हमखास व नियमित पाणीपूरवठा करण्यासाठी मोठे, मध्यम व लघु जलसिंचन योजना राबविल्या आहेत. तसेच सरकार जलसिंचन इ. वाढविण्याचाही प्रयत्न करीत आहे.

ISSN : 2278-9308
January 2020

शेती संशोधन व प्रशिक्षन यास चालना देण्यासाठी सरकारणे कृषी विद्यपिठे, महाविद्यालये व संशोधन संस्था स्थापन केलेल्या आहेत.

३. कृषी पतपुरवठा

शेती क्षेत्रात कर्ज किंवा वित्त पुरवठा करण्यासाठी सरकारने विविध संस्था स्थापन केलेल्या आहेत.

४. विपणन सुविधा

कृषी विपणन व्यवस्था सुधारण्यासाठी सरकारने नियमित बाजारपेठा विकसित केलेल्या आहेत. तसेच कृषी मालाचे श्रेणीकरण व प्रमाणीकरण करणे, वजन मापांचे प्रमाणीकरण करणे, बाजारपेठांविषयीची माहिती पुरविणे इत्यादी सुविधा निर्माण केलेल्या आहेत.

५. पिक विमा योजना

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे पीक बुडाल्यास त्यांना वित्तसहाय देण्यासाठी व पीक बुडाल्यानंतरही शेतकऱ्यांची पत टिकवून ठेवण्यासाठी इ. स. १९८५ मध्ये सर्वसमावेशक अशी पीक विमा योजना देशभर लागू केलेली आहे.

क) दारिद्र्य निर्मूलन आणि रोजगार निर्मिती यासंबंधीच्या उपाययोजना

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारने दारिद्र्य निर्मूलनाच्या व रोजगार निर्मितीच्या अनेक योजना व कार्यक्रम राबविले आहेत.

**१.सीमांत शेतकरी व शेतमजुर विकास अभिकरण**

ग्रामीण भागातील सर्वात गरीब घटक असणाऱ्या सीमांत शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचे दारिद्र्य दूरकरण्यासाठी ही योजना १९७०—७१ मध्ये सुरू केली होती. या योजने अतंर्गत या घटकांना शेतीबरोबरच अन्य रोजगार उदा. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मासेमारी इत्यादी जोडधंदे उपलब्ध करून देण्यासाठी अनुदानासह कर्जपुरवठा करण्यात आला.

२. लहान शेतकरी विकास अभिकरण

लहान शेतकऱ्यांना सुधारित कृषी उत्पादनतंत्र वापरणे शक्य व्हावे

३. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम

विहीरी, तळी, लघुजलसिचन प्रकल्प, बालवाड्य, शाळा, पंचायतगृहे इत्यादी स्वरूपाची टिकाऊ सामुदायिक मालमत्ता निर्माण करून ग्रामीण लोकांना फायदेशीर अशा अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी व ग्रामीण जीवनाची गुणवत्ता उंचावण्यासाठी ही योजना १९८० मध्ये सुरू केली होती.

४. ग्रामीण भुमिहीन रोजगार हमी कार्यक्रम

महाराष्ट्र सरकारने १९७२—७३ पासुन ग्रामीण भागातील अकुशल लोकांना रोजगार पुरविण्यासाठी रोजगार हमी योजना सुरू केली त्याच धर्तीवर केंद्र सरकारने ग्रामीण भूमिहिन लोकांसाठी रोजगार निर्मिती करण्यासाठी १५ ऑगस्ट १९८३ रोजी ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी कार्यक्रम सुरू केला.

५. ग्रामीण तरूणांसाठी स्वंयरोजगार प्रशिक्षणाची योजना

ग्रामीण युवकांना तांत्रिक कौशल्ये पुरवून कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मासेमारी, सुतारकाम, लोहारकाम चर्मोद्येग, वाहनदुरूस्ती इत्यादी क्षेत्रांत स्वयंरोजगार करावा या उद्देशाने ही योजना १५ ऑगस्ट १९७९ रोजी सरू केली.

६. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम

उत्पादन स्वरूपाची मालमत्ता व पैशाची मदत देऊन निवडक ग्रामीण कुटुंबांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम २ ऑक्टोबर १९८० रोजी सुरू केला. या कार्यक्रमातर्गत गरीब कुटुंबांना स्वयंरोजगार करता यावा म्हणून वित्तपुरवठा करण्यात आला.

७. जवाहर रोजगार योजना

ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील किमान एका व्यक्तीस वर्षातील किमान ५० ते १०० दिवस तिच्या कामाच्या ठिकाणी किंवा घराच्या जवळपास रोजगार उपलब्ध करून देऊन तिला मदत करण्यासाठी ही योजना १९८९ मध्ये सरू केली.

८. पंतप्रधान रोजगार योजना

२ ऑक्टोबर १९९३ रोजी पंतप्रधान नरसिंहराव यांनी ग्रामीण सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी खात्रीशीर रोजगार निर्माण करणारी ही योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत ४० लाख घटक सुरू केले व ३०.४ लाख अतिरिक्त रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात आल्या.

९. स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

ग्रामीण लोकांसाठी स्वयंरोजगार निर्माण करून त्यांचे दारिद्र्य दुर करण्यासाठी १ एप्रिल १९९९ रोजी ही योजना सुरू केली. पुर्वीच्या आयआरडीपी व ट्रायसेम ह्य दोन योजना विलीन करण्यात आल्या.

१०. कामासाठी अन्न हा राष्ट्रीय कार्यक्रम

१४ नोव्हेंबर २००४ रोजी हा कार्यक्रम केंद्र शासनाने देशातील सर्वात अधिक मागासकलेल्या १५० जिल्ह्यंत रोजगाराच्या संधी पुरविण्यासाठी सुरू केला. रोजंदारीवर काम करू इच्छिणाऱ्या सर्व अकुशल ग्रामीण लोकांना या कार्यक्रमाचा लाभ मिळू शकतो. या कार्यक्रमासाठी केंद्राकडून घटकराज्यांना मोफत अन्नधान्य पुरविले जाते.

११. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा– २००५

हा कायदा २ फेब्रुवारी २००६ पासून लागू केला आहे. प्रत्येक कुटुंबातील प्रौढ सदस्यांना जे अकुशल स्वरूपाचे काम करण्यास तयार आहेत. त्यांना प्रत्येक आर्थिक वर्षात किमान १०० दिवस रोजगार पुरविण्याची हमी या कायद्याने दिलेली आहे.

ड) विशेष घटकांसाठीच्या योजना

अनुसूचित जाती व जमाती, स्त्रिया व मुले, अपंग व निराधार अशा विशिष्ट घटकांचे दारिद्र्य दूर करण्यासाठीही सरकारने विविध योजना सुरू केल्या आहेत. त्यांपैकी प्रमुख योजना पुढील प्रमाणे–

१. संजय गांधी निराधार योजना

या योजनेअंतर्गत निराधार गरीब लोकांना सरकारतर्फे वित्तसहाय देण्यात येते.

२. इंदिरा आवास योजना

या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व जमातीतील गरिबांसाठी घरे बांधून दिली जातात.

३. दशलक्ष विहिरी योजना

अनुसूचित जाती व जमाती, सीमांत शेतकरी व दारिद्र्यरेषेखाली असलेले लहान शेतकरी यांच्या जमिनिला पाणी पुरविण्याच्या उद्देशाने १० लाख विहिरी खोदण्याची ही योजना देशभर राबविली गेली.

४. ग्रामीण भागातील महिला आणि बालकांचा विकास

ग्रामीण महिलांसाठी अर्थार्जनाचे उपक्रम सुरू करून त्यांची उन्नती साध्य करण्यासाठी ही योजना सुरू केली. साक्षरतेचे कमी प्रमाण व बालमृत्यूचे अधिक प्रमाण असलेल्या जिल्ह्यांची निवड करून त्यांतील खेड्यांतील महिलांच्या गटास (५ ते १० महिलांचा एक गट) रू. २५०००/— मात्र अर्थार्जनाचे उपक्रम सुरू करण्यासाठी दिले जातात.

इ) सामान्य कार्यक्रम

संपूर्ण देशातील दारिद्र्य दूर करण्यासाठी शासनाने अनेक कार्यक्रम राबविलेले आहेत. त्यांतील काही कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

१. वीस कलमी कार्यक्रम

दारिद्र्य व आर्थिक शोषण नष्ट करून दुर्बल घटकांचा उदधार करण्याच्या मुख्य उद्देशाने पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वीस कलमी कार्यक्रम १९७५—७८ या कालावधीत राबविला.

२. किमान गरजा कार्यक्रम

ग्रामीण पाणीपूरवठा, ग्रामीण आरोग्य, रस्ते बांधणी, प्रौढ शिक्षण ,प्राथमिक शिक्षण, ग्रामीण भुमिहीन मजुरांसाठी घरे बांधणे, ग्रामीण ऊर्जा, नगरातील गलिच्छ वस्त्यांची सुधारणा इत्यादी किमान गरजांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम १९७४—७५ मध्ये सुरू केला होता.

३. अंत्योदय अन्न योजना

इ.स २००० मध्ये ही योजना सुरू केली होती. गरिबांना अत्यंत स्वस्त दराने रेशन धान्य दुकानातून अन्नधान्य या योजनेदवारे पुरविले जाते. या योजने अंतर्गत रू. ३.०० मात्र प्रति किलो दराने तांदूळ व रू.२.०० मात्र प्रति किलो दराने गहू दिला गेला.

४. प्रधानमंत्री ग्रामोदय योजना

इ. स. २०००—२००१ मध्ये ही योजना सुरू केली.या योजनेअंतर्गत घटकराज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण, निवारा, पिण्याचे पाणी, सकस आहार, विद्युतीकरण अशा मूलभूत सेवा पुरवीता याव्यात म्हणून केंद्र सरकारकडून अर्थसहाय दिले जाते.

समारोप

ग्रामीण विकासाकडे एक प्रक्रिया, एक अपूर्व गोष्ट, एक धोरण आणि एक शाखा म्हणुन, यामध्ये व्यक्ती, समुदाय आणि राष्ट्रांचा मनाशी बाळगलेल्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठीची एक प्रक्रिया म्हणून, यामध्ये व्यक्ती, समुदाय, आणि राष्ट्रांचा सहभाग ध्वनित आहे. एक अपूर्व गोष्ट म्हणून ग्रामीण विकास हा विविध भौतिक, तांत्रिक, आर्थिक, सामाजिक सांस्कृतीक आणि संस्थात्मक घटनांमधील संवादाचा अंतिम परिणाम आहे आणि कोणत्याही वेळी याचे मोजमाप करता येते. एक धोरण म्हणुन, विशिष्ट लोकांच्या, अर्थात गरीब ग्रामीण लोकांच्या, गटाचे आर्थिक आणि सामाजिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी याची रचना केलेतर आहे. एक प्रणाली म्हणून, कृषी, सामाजिक, वर्तनात्मक, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन विज्ञानांच्या आंतरछेदांचे प्रतिनिधित्व करणारी ही बहुप्रणाली स्वरूपाची आहे.

संदर्भ ग्रंथसूची

१) कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र : लेखक — कवीमंडन, विजय, प्रकाशन त्र श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) ग्रामीण व नागरी समाजशास्त्र : लेखक — लोटे, राज प्रकाशन त्र पिंपळापुरे प्रकाशन नागपूर.

ISSN : 2278-9308
January 2020

३) आदिवासी आणि ग्रामिण विकास : लेखक – अजमेश, सुर्यकांता प्रकाशन त्र अर्थ व पब्लीकेशन
जळगाव.
४) ग्रामीण विकास : लेखक – वर्मा एस. बी प्रकाशन त्र अविष्कार पब्लीकेशन पुणे.